# जिल्हा परिषद वर्धा

**सामान्य प्रशासन विभाग**
**प्रशासकीय इमारत, सिव्हील लाईन,**
**वर्धा-४४२००१**

**फॅक्स क्र. ०७१५२-२४३२११** ई-मेल : dyceogenzpwardha@gmal.com


**पत्र क्र./जिपव/साप्रवि/आस्था-६/अनुकंपा/वशि- २७ /२०२५.** **दिंनांक : ०६ जानेवारी, २०२६.**

**अनुकंपा अंतरीम ज्येष्ठता यादी दि.०१.०१.२०२६.**

**प्रति,**

----------------------------------------------------------
----------------------------------------------------------
----------------------------------------------------------

**विषय : अनुकंपा तत्वावर नियुक्ती मिळणेबाबत उमदेवारांनी केलेल्या अर्जाची अंतरीम ज्येष्ठता यादी प्रसिध्द करणेबाबत.**

**संदर्भ : १.म.शा.साप्रवि शासन परिपत्रक क्र.अकंपा-१२२१/प्र.क्र१८६/का-८, दि.२६ ऑगस्ट, २०२१.**
**२.म.शा.साप्रवि शासन निर्णय क्र.अकंपा-१२१७/प्र.क्र.१०२/आठ, दि.२१ सप्टेंबर,२०१७.**
**३.म.शा.साप्रवि शासन निर्णय क्र.अकंपा-१००४/प्र.क्र.५१/२०४/आठ, दि.२२ ऑगस्ट, २००५.**
**४.म.शा.साप्रवि शासन निर्णय क्र.अकंपा-१२२५/प्र.क्र.१२१/म.लो.आ. दि.१७ जुलै, २०२५.**
**५.म.शा.ग्रा.वि.वि. शासन निर्णय क्र.अकंपा-२०२५/प्र.क्र.४४२/आस्था-७ दि.३१ जुलै, २०२५.**

उपरोक्त सदंर्भीय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, ज्या कर्मचाऱ्यांचा जिल्हा परिषद सेवेत असतांना अकाली मृत्यु होतो अशा कर्मचाऱ्यांच्या कुटुंबाची वाताहात होऊ नये म्हणुन शासनाने अशा कुटूंबांचे पालन पोषणाकरीता ज्या कुटुंबातील इतर कोणीही पालन पोषण करण्यासाठी सक्षम नाही किंवा शासकीय सेवेत नाही अशा कुटुंबातील एका व्यक्तीस अनुकंपा तत्वावर शासकीय सेवेत सामावून घेण्याची शासनाची भुमिका आहे. अशा जिल्हा परिषद सेवेत असतांना मृत्यू पावलेल्या कर्मचाऱ्यांच्या पात्र नातेवाईकांसाठी अनुकंपा तत्वावर नोकरी मिळणेबाबत केलेल्या अर्जाची ज्येष्ठता यादी(प्रतिक्षासूची) प्रसिध्द करण्यात येत आहे.

१. सोबतच्या यादीत **दि. ३१ डिसेंबर, २०२५** पर्यंत अनुकंपा तत्वावर विहीत मुदतीत नोकरी मिळणेकरीता प्राप्त झालेल्या परिपूर्ण अर्जाचा ज्येष्ठता यादीत समावेश केला आहे.
२. सदर ज्येष्ठता सूचीत अनुक्रंमाक **०१ ते ०५** पर्यत दर्शविलेली माहिती बरोबर असल्याची खात्री करण्यात यावी. त्यात काही चुका किंवा सुधारणा असल्यास पुराव्यासह **दिनांक - ३१, जानेवारी, २०२६** पर्यंत आक्षेप नोंदवावा.
३. सदर ज्येष्ठता सूचीतील काही रकान्यातील माहिती सुधारीत करावयाची असल्यास किंवा शैक्षणिक पात्रतेत वाढ करावयाची असल्यास तशी लेखी माहिती **दिनांक - ३१. जानेवारी, २०२६** पर्यंत सादर करावी. तसेच आपणास वेळोवेळी प्राप्त होणारे शैक्षणिक पात्रतेचे प्रमाणपत्र सुध्दा सादर करावेत.
४. सध्या प्रचलित असलेल्या नियमाप्रमाणे वेळोवेळी एका वर्षामध्ये जिल्हा परिषदेमध्ये सरळसेवेने रिक्त होणाऱ्या जागांच्या २० % पदे ही सदर प्रतिक्षासुचीमधील भरण्यात येईल.

५. कर्मचारी मृत्यु झाल्यापासून ०१ वर्षाच्या आंत अनुकंपा तत्वावर नोकरी मिळणेबाबत परिपुर्ण अर्ज संबंधित विभाग प्रमुखाकडे किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.वर्धा यांचे नावे केला पाहिजे.

६. अनुकंपा तत्वावर नोकरी मागणारा उमेदवार अल्पवयीन म्हणेजच १८ वर्षाच्या आत असला तरी त्याला किंवा त्याच्या कुटुंबातील सदस्यांना कर्मचारी मृत्यु झाल्यापासून ०१ वर्षाच्या आंत अर्ज सादर करावयाचा आहे. वयाची १८ वर्ष पुर्ण व प्रस्ताव परिपुर्ण झाल्यानंतर परिपुर्ण प्रस्ताव प्राप्तीचे दिनांकापासून प्रतिक्षा यादीत नाव समाविष्ठ करण्यात येईल.

७. उमेदवार अल्पवयीन असेल व त्याने ०१ वर्षाचे आंत अर्ज सादर केला असेल तरी तो अनुकंपा तत्वावर नोकरीसाठी वयाची १८ वर्ष पुर्ण झाल्यावरच पात्र होईल व वयाचे ४५ वर्ष होईपर्यत त्यास अनुकंपा तत्वावर नोकरीत सामावून घेता येईल. त्यानंतर मात्र वयाची ४५ वर्ष पुर्ण केलेल्या यादीतील उमेदवारांचे प्रकरण नस्तीबध्द केल्या जाईल. वयोमर्यादेत शासनाने वाढ केल्यास त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल.

8. शासन निर्णय क्र.अकंपा-१२२५/प्र.क्र.१२१/मलोआ, दि.१७ जुलै, २०२५ मधील पान क्र. १० मुद्दा क्र.(VII) ब- नुसार प्रतिक्षासूचीतील उमेदवार बदलणे बाबत काही अटी शर्ती नुसार सवलत देण्यात आली आहे. १. प्रतिक्षासूचीवरील उमेदवाराचा मृत्यु झाल्यास. २.प्रतिक्षासूचीवरील उमेदवारांचे नाव वयाची ४५ वर्षे पूर्ण झालयाने वगळल्यास. ३.प्रतिक्षासूचीतील उमेदवाराचे त्याच्या ऐवजी कुटुंबातील अन्य सदस्याचे नाव समाविष्ट करण्याचा अर्ज केल्यास व नाव बदलण्यास कुटुंबातील इतर सदस्यांनी ना हरकत प्रमाणपत्र दिल्यास.

9. त्या कर्मचाऱ्याचे स्वत:चे कुटुंब नाही त्या कर्मचाऱ्यांचे भाऊ किंवा बहिण अशा कर्मचाऱ्याचा मृत्यु झाल्यास त्याच्यावर अवलंबुन असलेल्या अशा बहिण किंवा भावाला अनुकंपा तत्वावर नोकरीकरीता अर्ज सादर करता येईल. मात्र त्याकरीता अशी बहिण किंवा भाऊ मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्याच्यावर अवलंबून असल्याबाबतचे पुरावे सिध्द करुन सादर करावे लागतील.

10. कुटुंबातील कर्ता मृत्यु पावल्यामुळे व त्या कुटुंबात दुसरा कोणीही वारस शासकीय सेवेत नसल्याने कुटुंबाची वाताहात होऊ नये म्हणून फक्त एका व्यक्तीस अनुकंपा तत्वावर नोकरी द्यावयाची आहे. त्याकरीता तसे शपथपत्र (प्रतिज्ञापत्र) सादर करावयाचे आहे. दिलेली माहिती खोटी निघाल्यास उमेदवाराला लागलेली नोकरी गमवावी लागेल व त्याच्यावर फौजदारी खटला चालविला जाईल, याची नोंद घ्यावी.

11. सदर प्रतिक्षासुची जिल्हा परिषदेच्या www.zpwardha.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच जिल्हा परिषद, वर्धा (मुख्यालय) व सर्व पंचायत समित्यांचे नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात आली आहे.

12. सदर ज्येष्ठता सूचीत काही बदल नोंदवायचे असल्यास किंवा शैक्षणिक कागदपत्रे सादर करावयाची असेल त्यांनी **दिनांक** 31 **जानेवारी, २०२६** पुर्वी सादर करावे. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या कागदपत्रांचा विचार केला जाणार नाही व अंतीम प्रतिक्षासुची प्रसिध्द करण्यात येईल.

**सहपत्र : अनुकंपा अंतरीम प्रतिक्षासूची दि. ०१.०१.२०२६ ,**
**एकुण पृष्ठ ०१**

Parag Soman.
**(पराग सोमण, भा.प्र.से)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद,वर्धा**

प्रतिलिपी :

१. मा.विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांना माहितीस्तव सविनय सादर.

२. मा.जिल्हाधिकारी, जिल्हा वर्धा.

३. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा.

४. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद, वर्धा.

५. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य), जिल्हा परिषद, वर्धा.

६. --------------------------------------------------------(खाते प्रमुख), जि.प.वर्धा.

७. गटविकास अधिकारी, पंचायत समिती,------------------------, जि.प.वर्धा.

८. बाल विकास प्रकल् अधिकारी, ए.ब.वि.से.यो. प्रकल्प---------------------------------.

९. मुख्याध्यापक, महात्मा गांधी विद्यालय, जि.प.वर्धा / जिल्हा परिषद कन्या शाळा, आर्वी

यासोबत संलग्न करण्यात आलेली अनुकंपा प्रतिक्षासूची आपण आपल्या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर त्वरीत प्रसिध्द करुन संबधित मृत कर्मचाऱ्याच्या वारसांच्या निदर्शनास आणुन द्यावी व तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

Parag Somani

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, वर्धा

# जिल्हा परिषद, वर्धा

## सामान्य प्रशासन विभाग

### अनुकंपा तत्वावर नोकरी देण्याकरीता असलेली उमेदवारांची अंतरीम प्रतिक्षा यादी दि. ०१.०१.२०२६ ची स्थिती

| अ.क्र./ अनुकंपा रजिस्टर क्रमांक | अर्जदाराचे संपूर्ण नाव | दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे नाव व पदनाम | दिवंगत झाल्याचा दिनांक | अर्जदाराचे दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांशी नाते | अर्ज प्राप्त झाल्याचा आवक क्र. व दिनांक | अर्जदाराची जन्म तारीख | जात व प्रवर्ग | शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १/३२४ | **कु. पल्लवी कविश्वर जारुंडे,** रा.चिंतामणी नगर, देवळी, ता.देवळी, जि.वर्धा. | **दिवंगत कविश्वर ऋषीजी जारुंडे,** सहायक शिक्षक, पंचायत समिती, देवळी, जि.प.वर्धा | ०२/०२/२०२३ | मुलगी | ५९१५ दि.०५/०७/२०२४ | ०६/०५/२००२ | महार / अनु.जाती | B.E.(Electronics& Comm.), १२ वी (७२.८३%) | परिपुर्ण प्रस्ताव प्राप्त आ.क्र.५९१५ दि. ०५/०७/२०२४. |
| २/३२८ | **श्री.रुपेश गजानन इजापुरे,** रा.दाते सभागृह समोर, तडस ले-आऊट, पिपरी मेघे, मानस मंदिर, वर्धा, ता.जि.वर्धा | **दिवंगत गजानन पुंडलीकराव इजापुरे,** सहायक अध्यापक, जि.प.उ.प्रा.शाळा, झाडगाव, पं.स.वर्धा, जि.प.वर्धा | १८/१०/२०२४ | मुलगा | ३४३० दि.०९/०४/२०२५ | ०९/०४/१९९७ | गवळी / भ.ज.(ब) | बी.ए. (पत्रकारीता व जनसंचार), एम.ए. (Advert & Public Relation) | परिपुर्ण प्रस्ताव प्राप्त आ.क्र.३४३० दि.०९/०४/२०२५. |
| ३/२७७ | **श्री.देवांश नामदेव कलोडे,** रा.२०८, नागपुर रोड, शारदा मुकबधीर विद्यालय जवळ, वार्ड क्रं. ०१, आलोडी, पो.नालवाडी, ता.जि.वर्धा | **दिवंगत नामदेव नथ्थुजी कलोडे,** सहायक अध्यापक, जि.प.उ.प्रा.शाळा, गोजी, पं.स.वर्धा, जि.प.वर्धा | २६/०३/२०२१ | मुलगा | २०९१ दि.३१/०८/२०२१ | १३/०८/२००६ | तेली / इ.मा.व. | १० वी, डिप्लोमा इन सिव्हील ॲन्ड रुलर इंजिनिअरींग (Polytecnics) | परिपुर्ण प्रस्ताव प्राप्त आ.क्र.६९८४ दि.१७/०७/२०२५. |
| ४/३३० | **श्री.निलेश शामरावजी टोपले,** रा.काजळी, ता.कारंजा, जि.वर्धा | **दिवंगत दिलीप शामरावजी टोपले,** वरिष्ठ सहायक, ग्रा.पा.पु. उपविभाग, पं.स.आष्टी, जि.प.वर्धा | ३०/०५/२०२५ | मुलगा | ६८९४ दि.१४/०७/२०२५ | ०४/०९/१९९८ | भोयर / इ.मा.व. | १० वी (६९%), १२ वी (४६.७७%), पदवी-BBA | परिपुर्ण प्रस्ताव प्राप्त आ.क्र.६८९४ दि.१४/०७/२०२५. |
| ५/३३१ | **श्री.प्रवीण शंकरराव तामगाडगे,** कॉटेज हॉस्पीटल जवळ, यशवंत नगर, व्ही.टी.सी.हिंगणघाट, ता. हिंगणघाट, जि.वर्धा | **दिवंगत विद्या भिमराव खेळकर,** आरोग्य सेविका, प्रा.आ.केंद्र, आंजी(मोंठी), पं.स.वर्धा.जि.प.वर्धा | २९/०९/२०२५ | पति | ८४९४ दि.१२/१०/२०२५ | ०५/०३/१९८३ | महार / अनु.जाती | १२वी(५०.६७%), | परिपुर्ण प्रस्ताव प्राप्त आ.क्र.८४९४ दि.१२/१०/२०२५. |

(अमोल भोसले)
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)
जिल्हा परिषद, वर्धा

Parag Soman
(पराग सोमण, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, वर्धा